# विश्वपताका फडकते जगभर






● मीना गोडखिंडी

युरोप, जर्मनी, ब्राझिल, मॉस्को, झुरीच, न्यू जर्सी, बर्लिन, बेलग्रेड, मुनिच, सोफिया, रिओ-डी जानीरो, तेल राज्ये, ॲमस्टरडॅम, अशा जगभरातील परदेशी होमिओपॅथी डॉक्टर्सना होमिओपॅथीचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देणाऱ्या भारतातील पहिल्या महिला डॉक्टर म्हणजे डॉ. अनिता साळुंखे! डॉ. अनिता जगभरातील विविध देशांत होमिओपॅथी डॉक्टर्स, प्रशिक्षण वर्ग घेतात. त्यासाठी साधारण वर्षातून ६/७ वेळा तरी त्यांना परदेशी जावे लागते. प्रशिक्षणानंतर ते परदेशी डॉक्टर्स, पेशंटच्या आजाराची माहिती असलेली सीडी डॉ. अनितांकडे पाठवितात. फोनवरून पेशंटची सर्व हिस्टरी कळवितात. त्यानंतर डॉ. अनिता व परदेशी डॉक्टर्स यांच्यात इंटरनेटवर २/३ वेळा 'सिटिंग्ज' होतात आणि मग आजारानुसार होमिओपॅथी औषधे कुरियरने जगभरात पाठविली जातात. होमिओपॅथीचा प्रचार व प्रसार करणाऱ्या डॉ. अनिता म्हणतात, 'परदेशी डॉक्टर्सना 'होमिओपॅथी' जास्त फायदेशीर आहे हे समजले आहे. पण भारतीयांचा मात्र अजून ॲलोपॅथीकडेच कल आहे. तरी मी मात्र याबाबत पूर्णपणे आशावादी आहे कारण होमिओपॅथी हे असे एक सर्वोत्तम शास्त्र आहे की त्यापासून रोगप्रतिकारक शक्ती वाढते. ही शक्ती वाढली की, विविध आजारांपासून संरक्षण होते. पण ही पॅथी मुळापासूनच समजून घ्यायला हवी. शास्त्रशुद्ध, संशोधनात्मक, होमिओपॅथी म्हणजे जगाला मिळालेले एक वरदान आहे.'

अनितातांईना बारावीनंतर एम.बी.बी.एस.ला ॲडमिशन मिळाली नाही. काहीशा निराश मनस्थितीत त्यांनी पुण्याच्या डी.एस. होमिओपॅथी कॉलेजमध्ये ॲडमिशन घेतली व १९८७ ला त्यांनी होमिओपॅथीत एम.डी. केले. या अभ्यासक्रमात ॲलोपॅथी हा एक विषय असल्यामुळे या पॅथीचाही त्यांनी मनापासून अभ्यास केला. डॉक्टर म्हणून पूर्ण ज्ञान मिळविण्यासाठी, पूर्णपणे नाईट शिफ्ट करून, आणीबाणीत डॉक्टरांची जी कामे असतात त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन त्यांनी जॉय हॉस्पिटलमध्ये ॲलोपॅथीत आपले ज्ञान अपटुडेट केले. चेंबूरच्या झोपडपट्टीत तर महिला पेशंटवर मोफत उपचार केले. पण त्या वेळी त्यांच्या असे लक्षात आले की, ॲलोपॅथी औषधाची पुन्हा पुन्हा ट्रीटमेंट देऊनसुद्धा आजार पूर्णपणे बरा होत नाही. कारण 'ॲलोपॅथी'चे 'साईड इफेक्ट' पेशंटवर सातत्याने होतात. आणि हाच विचार त्यांचा टर्निंग पॉइंट' ठरला. त्यांच्या असे लक्षात आले की 'होमिओपॅथी' डॉक्टरच परिपूर्ण डॉक्टर होऊ शकतो. होमिओपॅथी उपचार पद्धतीमुळे चांगले रिझल्टस् त्यांना मिळायला लागले. मग त्यांनी चेंबूरमध्ये स्वतःचे होमिओपॅथी क्लिनिक सुरू केले आणि होमिओपॅथीचा 'प्रचार, प्रसार, उपचार, शास्त्रशुद्ध चिकित्सा, व प्रशिक्षण' हाच त्यांचा ध्यास ठरला. होमिओपॅथी कॉलेजमधील बरेच विद्यार्थी त्यांच्याकडे शिकायला यायला लागले. 'फोरम'मध्ये डॉ. अनितांची व्याख्याने अभ्यासपूर्ण व संशोधनात्मक ठरू लागली. व्हिडीओ केसेसमुळे ज्ञानाची व्याप्ती वाढली, चांगल्या उपचार पद्धतीमुळे पेशंटचे आजार बरे होऊ लागले. लोकांची होमिओपॅथीवरील श्रद्धा वाढायला लागली. आणि डॉ. अनिता ख्यातनाम डॉक्टर त्यांनी सुरुवात केली आणि मग असे लक्षात आले की, परदेशापेक्षा भारतातच होमिओपॅथी कॉलेजेस अधिक आहेत. भारतातच होमिओपॅथीचा अभ्यासक्रम अधिक श्रेष्ठ, शास्त्रशुद्ध व संशोधनात्मक पद्धतीने शिकविला जातो. परदेशात मॉस्को, ब्राझिल वगैरे ४/५ देश वगळता होमिओपॅथी कॉलेजेस नाहीत. याच पार्श्वभूमीवर १९९८ला पहिले इंटरनॅशनल होमिओपॅथी वर्कशॉप मुंबईला त्यांनी घेतले. या वर्कशॉपमध्ये १५ देशांचे परदेशी डॉक्टर्स सहभागी झालेले होते. गोव्यात परदेशी होमिओपॅथी डॉक्टर्स जास्त संख्येने शिकायला येतात. साधारण २०० परदेशी डॉक्टरांची होमिओपॅथी सेमिनारला उपस्थिती असते. मग जगभरात जाऊन होमिओपॅथी प्रशिक्षण देण्याचा विचार दृढ झाला. जगभरातील १३ देशांना हा विचार स्तुत्य वाटला आणि मग सुरू झाली डॉ. अनिता साळुंखे यांची जगभ्रमंती!

'होमिओपॅथी' हे परिपूर्ण शास्त्र आहे. याचा उल्लेख 'चरक व सुश्रुत' या संहितेत आहे. १७९० ला जर्मनीमध्ये डॉ. सम्युअल हाहेनेमन हे ॲलोपथिक डॉक्टर होते. त्यांचा मुलगा आजारी पडला. त्याच्यावर उपचार करूनसुद्धा डॉ. सम्युअल त्याला वाचवू शकले नाही तेव्हा 'ॲलोपॅथी' हे काही योग्य सायन्स नाही म्हणून त्यांनी संशोधन सुरू केले व त्यांना होमिओपॅथीविषयी विश्वास निर्माण झाला. हा जरी इतिहास असला तरी 'चरक व सुश्रुत' ग्रंथांत या औषध पद्धतीचा किती तरी आधीच विचार केलेला होता. 'होमिओपॅथी' खऱ्या अर्थाने भारतातच विकसित झाली, याचा प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटला पाहिजे. डॉ. अनितांनी आतापर्यंत हजारो केसेस आपल्या औषध प्रणालीने बऱ्या केलेल्या आहेत. एखादा आजार होऊ नये म्हणून त्या त्या आजाराची लस टोचली जाते पण आपल्या पूर्ण शरीराचेच लसीकरण होमिओपॅथी करते. गुडघेदुखी, सांधेदुखी,




(पान ९ वरून)

विषय अत्यंत व्यापक आहे. 'काट्याने काटा काढणे' हे आमचे तंत्र आहे. होमिओपॅथी औषधे निसर्गापासूनच बनविली जातात. वनस्पती, सापाचे वीष, माशाचे तेल, वेगळे वेगळे धातू, चुंबक इ. इ.चा वापर आमच्या औषधांत असतो. सांधेदुखीवर कॅल्शियम दिले जाते पण जर का कॅल्शियम पचविण्याची शक्तीच पेशंटजवळ नसेल तर सांधेदुखी बरी कशी होणार? नेमका हाच पॉइंट लक्षात घेऊन आम्ही होमिओपॅथी औषधप्रणाली बनवली आहे. होमिओपॅथी माणसाला औषध देते, आजाराला नाही! माणूस आजारी का पडतो? त्याच्या शरीराचे संतुलन का बिघडते? कष्टकरी महिला, मजूर, ओझेवाहक, वरचेवर आजारी का पडत नाहीत? याचे एकच कारण ते म्हणजे प्रत्येक माणसाच्या रोगप्रतिकारक शक्तीची कमी-जास्त क्षमता किंवा पूर्णपणे अभाव! आम्ही प्रत्येक पेशंटला त्याचा इतिहास व वर्तमान विचारतो. त्याचा स्वभाव, त्याची जीवनशैली व परंपरागत आजार, त्याचा बेसिक नेचर, त्याची गती, त्याची बुद्धी इ. गोष्टी सखोलपणे विचारून झाल्यावरच आम्ही औषधोपचार सुरू करतो. आमच्या औषधप्रणालीमध्ये आजार वरून खाली आणि आतून बाहेर हार्टपासून स्किनपर्यंत बाहेर फेकला जातो. आपली स्किन म्हणजे आपल्या शरीराचे 'दरवाजेच' आहेत. या दरवाजातूनच शरीरातला कचरा बाहेर काढला जातो. हाच मूलभूत विचार लक्षात घेऊन आम्ही प्रत्येक आजारावर उपचार करतो! रोगप्रतिकारक शक्ती वाढवणे हाच आमचा हेतू आहे! तसेच पेशंट आधी ॲलोपॅथी नंतर आयुर्वेद व नंतर शेवटचा उपाय म्हणून 'होमिओपॅथी'कडे वळतात याची मला विलक्षण खंत वाटते. अगदी सुरुवातीलाच जर पेशंट आमच्याकडे आले तर आम्ही रोगप्रतिकारक शक्ती वाढवून निश्चित उपाययोजना करू शकतो पण तसे होत नाही. पण पेशंट अगदी 'लास्ट स्टेज'ला आला तर उपाय होणे कठीण असते. शेवटी प्रत्येक पॅथीला मर्यादा या आहेतच.'

डॉ. अनिता सकारात्मक विचारांचे पाठबळ देतात. प्रत्येकाकडे बघण्याचा बरा-वाईट दृष्टिकोन योग्य रीतीने संतुलित केला तर ताणतणाव राहत नाहीत. स्वभाव बदलण्यासाठी मानसिक तयारी त्या करून घेतात. जसे तुमचे आचार, विचार आणि वागणूक तशी तुमच्या चेहऱ्याची ठेवण तयार होते पण होमिओपॅथी औषधोपचारानंतर चांगले विचार, चांगले आचार व चांगली वागणूक असा आकृतिबंध तयार होऊन चेहऱ्याची ठेवण सात्त्विक होते व नात्यानात्यातील संबंध सुदृढ बनतात. शारीरिक आजार बरे होण्यासाठी मानसिक मनोबल सक्षम होणे जरुरीचे आहे. यासाठीच डॉ. अनिता होमिओपॅथी औषध तंत्राचा यशस्वी प्रयोग रुग्णावर करतात. प्रत्येक माणसाच्या गुणधर्मावर त्यांच्याकडे औषध आहे. प्रत्येक अवयवाला त्याचे नेमून दिलेले काम करण्याची शक्ती डॉ. अनिता यांच्या उपचारामुळे मिळते. सर्व भावना कंट्रोलमध्ये ठेवता येतात. १९८९ पासून विविध आजारांवरील केसेस त्या बऱ्या करत आहेत. आजमितीस ३ ते ३॥ हजार अवघड केसेस त्यांनी हाताळल्या आहेत. डॉ. अनितांमध्ये दुर्दम्य आत्मविश्वास संशोधक वृत्ती आणि होमिओपॅथीबद्दल त्यांच्या मनात अपार श्रद्धा आहे. अर्धवट ज्ञानावर होमिओपॅथी औषध उपचार करणारे अनेक आहेत आणि त्यांच्यामुळेच लोकांच्या मनात या पॅथीबद्दल संदेह निर्माण होतो याची अनितताईंना विलक्षण खंत वाटते. त्यांच्या या आगळ्यावेगळ्या प्रवासात त्यांना साथ दिली आहे ती त्यांचे यजमान संजय साळुंखे, सासूबाई आणि मुलगी सानिया हिने! संजय साळुंखे यांची 'Net Technologies' नावाची सॉफ्टवेअर कंपनी असून विशेष अभिनंदनीय गोष्ट म्हणजे एका मराठी माणसाच्या कंपनीत